वाचले :-

१. मा.सहाय्यक विमा संचालक, विमा संचनालय,महाराष्ट्र राज्य , मुंबई यांचेकडील दि.०४/०९/२०१९ रोजीचे पत्र.

२. मा. अति. आयुक्त – २ यांचेकडील दि२३/०९/२०१९ रोजीचा मान्य प्रस्ताव .

---

**परिपत्रक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८.
कामगार कल्याण विभाग,
जा. क्र. काक/३ कावि/३८४/२०१९,
दिनांक – २३/०९/२०१९.

प्रति ,
मा. सर्व संबधित विभाग प्रमुख,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८.

विषय ;- महानगरपालिका, स्मार्टसिटी व प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत दिल्या जाणाऱ्या कंत्राटी कामाचा (CAR) व त्यावर नियुक्त करण्यात येणाऱ्या कामगारांचा विमा (WC)शासकीय विमानिधीकडे उतरविणे बाबत.....

२/-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून कंत्राटदारामार्फत कामे केली जातात. सदरची कामे करण्यासाठी कंत्राटदारामार्फत कामगारांची नेमणूक केली जाते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विकास कामे सुरु आहेत. स्मार्ट सिटी , पाणीपुरवठा, आरोग्य व वैद्यकीय सेवा, रस्ते विकास, झोनिपु स्थापत्य, EVS कामाचे आदेश मनपामार्फत दिले जातात.

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील महानगरपालिकानी त्यांच्या मार्फत देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या कंत्राटी कामाचा व त्या कामावर काम करणाऱ्या कामगारांच्या नुकसान भरपाईचा विमा ( CAR/ SCR/ MCE/ TCE/ EAR & WC/ EC) थेट पद्धतीने या कार्यालयाकडे उतरविणे प्रकर्ता या नात्याने बंधनकारक असल्याचे कळविले आहे.तसेच स्थानिक व तत्पर विमासेवा मिळावी म्हणून दि. ओरिएन्टल इन्शुरन्स कं. लि. चिंचवड विभागीय कार्यालय ( 161800), बहिरवाडे चेंबर, पहिला मजला , टेल्को रोड, चिंचवड पुणे – ४११००९. यांना अनुमती देण्यात आली होती.

मा.सहाय्यक विमा संचालक यांनी वाचले क्र. १ अन्वये कळविले नुसार की, सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षासाठी दिनांक ०८/०९/२०१९ पासून उपरोक्त विमा कंपनी ऐवजी नॅशनल इन्शुरन्स क. लि. चिंचवड विभागीय कार्यालय( २७१००१), जय टावर्स, एस . न. १५४/४/२, काळभोर नगर, मुंबई- पुणे रोड, चिंचवड पुणे ४११०१९.या कंपनीच्या कार्यालयाकडे सहविमा सेवा पद्धतीने ( शासकीय विमा निधी ४०%व विमा कंपनीचा सहभाग ६०%) विमा उतरविण्याकरिता अनुमती दिलेली आहे. मात्र , विमा कंपनीकडून विमापत्रे स्वीकारताना प्रत्येक विमापत्रावर शा.वि.नि. चा ४०% सहविमा सहभाग दर्शविणे व तो सहविमा सहभाग विहित कालावधीत तिमाही देणेच्या सूचना विमा कंपनीस कराव्यात व त्या पत्राची एक प्रत या संचालनालयास पाठविणे बाबत कळविले आहे.

उपरोक्त नॅशनल इन्शुरन्स क. लि.चिंचवड विभागीय कार्यालया व्यतिरिक्त इतर शाखा व विमा कंपनीकडील विमापत्रे व शा. वि. नि चा सहभाग न दर्शविलेली विमापत्रे ग्राह्य धरली जाऊ नयेत . सहविमा सेवेतर्गत कंत्राटदारांनी केवळ उपरोक्त कंपनीच्या म्हणजेच नॅशनल इन्शुरन्स क. लि. चिंचवड विभागीय कार्यालय( २७१००१), जय टावर्स, एस . न. १५४/४/२, काळभोर नगर, मुंबई- पुणे रोड, चिंचवड पुणे ४११०१९. व्यवस्थापिका श्रीम. एच . एस. लचके ( दूरध्वनी क्र. ०२०-२७४७००२, २७४५९५६५/ भ्रमणध्वनी क्र. ८४११८८६१०३) यांचेशी संपर्क साधून विमा उतरवून घेण्यात यावा.

सबब विभागप्रमुखांना सूचित करण्यात येते कि,महाराष्ट्र शासनाच्या सूचनेनुसार आपले विभागातील सर्व प्रकारच्या कामाचा व त्यावर काम करणाऱ्या कामगारांच्या नुकसान भरपाईचा विमा **नॅशनल इन्शुरन्स क. लि. चिंचवड विभागीय कार्यालय( २७१००१), जय टावर्स, एस . न. १५४/४/२, काळभोर नगर, मुंबई- पुणे रोड, चिंचवड** पुणे ४११०१९ यांचेकडे उतरविण्यात याव. सदर परिपत्रकानुसार त्वरित कार्यवाही करावी.

( अजित पवार )
अति.आयुक्त -२
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८.

प्रत ;-

१. मा.सहाय्यक विमा संचालक,
विमा संचनालय,
महाराष्ट्र राज्य ,
मुंबई.

२. मा.व्यवस्थापक,
नॅशनल इन्शुरन्स क. लि.
चिंचवड विभागीय कार्यालय( २७१००१),
जय टावर्स, एस . न. १५४/४/२,
काळभोर नगर, मुंबई- पुणे रोड,
चिंचवड पुणे ४११०१९.

३. दि. ओरिएन्टल इन्शुरन्स कं. लि.
चिंचवड विभागीय कार्यालय ( 161800),
बहिरवाडे चेंबर, पहिला मजला ,
टेल्को रोड, चिंचवड पुणे – ४११००९.